# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१४९३**

**अपिलार्थी श्री. ईम्तीयाझ ई. शेख**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०९.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ११.११.२०२३ | २५.०१.२०२४ | २०.०१.२०२४ | ०७.०८.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०५.०३.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. १६.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

अपिलार्थी यांनी दि. ११.११.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार श्री. धनाजी तोरस्कर तत्कालिन प्रांत अधिकारी पालघर यांच्याविरुध्द भुसंपादनबाबत चालू असलेल्या चौकशी कामी माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून उत्तर न मिळाल्याने अपिलार्थींनी दि. २०.०१.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी उपस्थित असून तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०९.०९.२०२५ आयोगासमोर सादर करुन मान्य केले की, अपिलार्थींचा माहिती अर्ज दि. ११.११.२०२३ रोजीच्या अनुषंगाने उत्तर देण्यात आले नव्हते. परंतु, अपिलार्थी यांनी दि. २०.०१.२०२४ रोजी प्रथम अपील सादर केले तेव्हा त्यांनी त्यांचे पत्र दि. २५.०१.२०२४ अन्वये अपिलार्थींना कळविले की, त्यांचा दि. २७.१२.२०२१ रोजीचा तक्रार अर्ज विभागीय आयुक्त, कोकण यांना दि. २३.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये उचित कार्यवाही करीता

..२/-

पाठविला आहे व अपिलार्थीना दि. २३.०७.२०२२ रोजीच्या पत्राची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली. सदर पत्रात जन माहिती अधिकारी यांनी नमुद केले की, अपिलार्थी यांचे समाधान न झाल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करु शकता.

अपिलार्थी यांची प्रथम अपील अर्ज दि. २०.०१.२०२४ वर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेशात नमुद केले की, माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असते ती माहिती अपिलार्थींना द्यावयाची असते. परंतु, सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने अपिलार्थींना पुरविलेली नाही असे नमुद करुन सदर अपील अमान्य केलेले आहे.

आयोगाकडे उपलब्ध अभिलेखावरुन स्पष्ट होते की, तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्ज दि. ११.११.२०२३ वर अपिलार्थींना उपलब्ध उत्तर/ माहिती दिलेले नाही व अपिलार्थींनी प्रथम अपील दाखल केले तेव्हा दि. २५.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. यापुढे जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमानुसार प्राप्त अर्जावर अधिनियमातील तरतूदीप्रमाणे विहित कालावधीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

10-9-2025

**मुंबई**
**दिनांक : १०.०९.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**